# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/०३/२०२४ (गुरूवार) दुपार**


---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २८/०३/२०२४चे ०८.३० वा. दरम्यानपोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ पोस्टे मौदा हद्दीत अवैध रेती वाहतूकीस आळा घालणेकरीता पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गोपनीय सुत्रानुसार भंडारा ते नागपूर NH-53 रोडवर टिप्पर क्र. MH-40/BL-1806 हा येतांना दिसल्याने सिंगोरी शिवारातील सिंगोरी फाटयावर नाकाबंदी दरम्यान टिप्परला थांबवून पाहणी केली असता टिप्पर क्र.MH-40/BL-1806 मध्ये अंदाजे ०६ ब्रास रेती मिळुन आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्यांनी रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीचे ताब्यातून टिप्पर क्र. MH-40/BL-1806 किंमती २०,००,०००/—रू. व त्यामधील ०६ ब्रास रेती किंमती २४,०००/—रू. असा एकुण २०,२४,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून टिप्पर चालक **आरोपी नामे— नरेश महादेव डोंगरवार, वय ४० वर्ष, रा. कोंडी ता. जि. भंडारा तसेच टिप्पर मालक पंकज गजानन गावंडे, वय ३० वर्ष, रा. नवरगाव ता. मौदा** यांचेविरूद्ध कलम ३७९, १०९, ३४ भादंवि. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. मौदा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतिशसिंग राजपूत, सपोनि मनोज चौधरी, पोहवा प्रकाश गाठे, पोलीस अंमलदार शुभम ईश्वरकर, अतुल निंबारते, आशिष रडके यांनी पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर